# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 05/02/2024 (सोमवार) सायंकाळ

---

## कुही येथील जुगार अड्ड्यावर विशेष पथकाची धाड

दि. ०४/०२/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक सा. यांचे विशेष पथक हे पो.स्टे. कुही परीसरात खाजगी वाहनाने पेट्रोलींग करीता फिरत असताना विश्वसनीय मुखबीरद्वारे खबर मिळाली की, ओपी पाचगाव हद्दीत मौजा टाकळी शिवारात असलेल्या रोडला लागुन सार्वजनिक ठिकाणी लिंबाच्या झाडाखाली काही लोक पैश्याची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत आहेत. अश्या माहितीवरून सदर घटनास्थळी जावुन रेड केली असता **आरोपी नामे – १) सल्लाउद्दीन यासुद्दीन, वय ४२ वर्ष रा. मोमीनपुरा बड़ी मस्जीद जवळ नागपूर २) वचन दादारावजी राउत वय ३७ वर्ष, रा. जुनी विडीपेठ डॉक्टर बोचला जवळ नागपूर ३) दिलीप गौतम वहाणे, वय ४३ वर्ष, न्यु बिडीपेठ धांड़े किराणा स्टोअर्स जवळ नागपूर ४) मुजीब अहमद जमीर अहमद वय ४० वर्ष, रा. मोमीन पुरा बडी मस्जीद जवळ नागपूर ५) जितु जागोबाजी दगड़े, वय ४५ वर्ष, रा. भांडेप्लॉट चौक नागपूर** हे तासपत्त्यांवर पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन नगदी ४०,३७०/–रू. ५२ तासपत्ते असा एकुण ४०,४२०/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी क्र. १) ते ०५) यांच्या विरूद्ध पोस्टे कुही येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही ही श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, हरीहर सोनकुसरे, पोहवा हरीदास चाचरकर, चांगदेव कुथे, पोलीस अंमलदार आशिष खंडाईत, विकेश राउत, अनिल करडखेले यांनी केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर